

## साईलीला फारच उत्तम

सध्या आपले साईलीला मासिक फारच उत्तम निघते. ह्या बद्दल आपले अभिनंदन

डॉ. के. एल. मुगी
४३ मेन रोड, नासिक

## मांडणी व मजकूर दोन्ही उत्तम

मार्च-एप्रिल ९६ या श्री साईलीला अंक मिळाला व खूप आनंद झाला. आता अंक वेळेवर मिळू लागले आहेत त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. अंकाची मांडणी आणि मजकूर दोन्ही उत्तम आहेत.

**अविनाश पाध्ये**
राम मंदिर रोड, बोरीवली मुंबई

# साईभक्तांना पर्वणी : साईनाम जपाचे घड्याळ

काळ वेळ समजण्यासाठी 'घड्याळ' या वस्तूची अपरिहार्यता आपण सर्वजण जाणतो. या वस्तूने मानवी जीवनात एक अपरिहार्य स्थान निर्माण केलेले आहे. आजकाल घड्याळाविना हात व एखादे घर मिळणेच शक्य नाही. इतकी ही वस्तू हातोहात व घरोघर झालेली आहे.

विविध रंगांची, विविध आकाराची चित्राकर्षक व लक्षवेधी घड्याळे निर्माण करण्यात देशी - विदेशी घड्याळ निर्मिती कंपन्यांमध्ये सध्या फार मोठी स्पर्धा आपण पाहतो. अजंता कंपनीच्या म्युझिकल घड्याळांची टी. व्ही. वरील जाहीरात हा त्या स्पर्धेतीलच एक भाग आहे. वेगवेगळ्या ध्वनींची, वेगवेगळ्या वाद्यांच्या सुरावटी ऐकवून घरातील वातावरण आनंदी-उत्साही करणाऱ्या घड्याळानंतर मुंबईच्या **'क्षेत्र टाईम्स'** (प्रा. लि.) या कंपनीने विविध देवदेवतांचे मंत्र-श्लोक व नामजपाने घड्याळप्रेमींच्या पहाटवेळा प्रसन्न करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पहाटेच्या निरव शांत वातावरणात आपल्या इष्ट देवतेच्या नामाच्या जयघोष कल्पना ऐकण्याची ही खरोखरीच स्तुत्य आहे.




श्रीकृष्ण, श्रीराम, श्रीबालाजी, भगवान महावीर, गुरुनानक, दुर्गामाता, ॐ नमः शिवाय 'वक्रतुंड महाकाय..' आदी देवदेवता संत यांच्या जपांचा या घड्याळ्याच्या गजरामध्ये समावेश असून श्री साईबाबा यांचा **'ॐसाई, श्री साई, जयजय साई'** हा नामजप साईभक्तांना एक पर्वणी ठरावा असा श्रवणीय आहे.

क्षेत्र टाईम्स निर्मित हे घड्याळ सर्वत्र उपलब्ध असून त्याची किंमत रु. ३५०/- आहे.

माझी देवपुजा देवपुजा । पाय तुझे गुरुराजा ॥ध्रु॥
गुरुचरणाची माती । तेचि माझी भागीरथी ॥१॥
गुरुचरणाचा बिंदु । तोचि माझा क्षीरसिंधु ॥२॥
गुरुचरणाचें ध्यान । तोंचि माझें संध्या-स्नान ॥३॥
शिवदिन केसरिपायीं । सद्गुरुवांचुनि दैवत नाहीं ॥४॥

गरुमहाराज गुरु जय जय परब्रह्म सद्गुरु ॥ ध्रु.॥
चारी मुक्तीदायक दाता उदार कल्पतरु ॥ जय.॥१॥

# सर्व साईभक्तांना आवाहन !

प्रिय साईभक्तांनो !

सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा.

या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावरही कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकित,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला'**

--- इथे कापा ---

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई-४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशे पन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता. क. : सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# SHRI SAI BABA SANSTHAN, SHIRDI

**Publications of Shri Sai Baba Sansthan, Shirdi**

| No. | Name of the Book | Language | Price Rs. | Packing and Postage Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Shri Sai Satcharita | Marathi | 48.00 | 12.00 |
| 2. | Shri Sai Satcharita | English | 18.50 | 10.00 |
| 3. | Shri Sai Satcharita | Hindi | 24.00 | 10.00 |
| 4. | Shri Sai Satcharita | Gujarathi | 23.00 | 11.00 |
| 5. | Shri Sai Satcharita | Kannada | 22.00 | 10.00 |
| 6. | Shri Sai Satcharita | Telugu | 27.00 | 10.00 |
| 7. | Shri Sai Satcharita | Tamil | 27.00 | 10.00 |
| 8. | Shri Sai Satcharita | Sindhi | 22.00 | 10.00 |
| 9. | Shri Sai Satcharita (Pothi) | Gujarathi | 31.00 | 12.00 |
| 10. | Shri Sai Leelamrit | Marathi | 9.50 | 10.00 |
| 11. | Shri Sai Leelamrit | Hindi | 12.50 | 10.00 |
| 12. | Shri Sai Leelamrit | Gujarathi | 6.65 | 8.00 |
| 13. | Avtar Karya | Marathi | 6.80 | 8.00 |
| 14. | Stavan Manjiri | Marathi | 1.00 | 8.00 |
| 15. | Stavan Manjiri | Hindi | 1.15 | 8.00 |
| 16. | Stavan Manjiri | Gujarathi | 1.30 | 8.00 |
| 17. | Stavan Manjiri | English | 2.00 | 8.00 |
| 18. | Sagunopasana (Arti) | Marathi | 1.25 | 8.00 |
| 19. | Sagunopasana (Arti) | Hindi | 1.50 | 8.00 |
| 20. | Sagunopasana (Arti) | Gujarathi | 1.10 | 8.00 |
| 21. | Sagunopasana (Arti) | Telugu | 4.60 | 8.00 |
| 22. | Sagunopasana (Arti) | Sindhi | - | 8.00 |
| 23. | Four Adhyayas (Dasganu's) | Marathi | 3.00 | 8.00 |
| 24. | Pictorial Sai Baba | Marathi/Eng. | - | 8.00 |
| 25. | Children's Sai Baba | Marathi | 2.00 | 8.00 |
| 26. | Children's Sai Baba | English | 2.60 | 8.00 |
| 27. | Children's Sai Baba | Hindi | 2.00 | 8.00 |
| 28. | Children's Sai Baba | Gujarathi | 1.75 | 8.00 |
| 29. | Children's Sai Baba | Telugu | - | 8.00 |
| 30. | Rudradhyaya (A-11) | Marathi | 1.15 | 8.00 |
| 31. | Sai the Superman | English | 6.70 | 8.00 |
| 32. | Sai Baba of Shirdi (Bharucha) | English | - | 8.00 |
| 33. | Sai Baba of Shirdi (Pradhan) | English | 3.50 | 8.00 |
| 34. | Raghunath Savitri Bhajan Mala | Marathi | - | 10.00 |
| 35. | Khaparde Diary | English | 11.00 | 10.00 |






श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे अधिकृत नियतकालिक सप्टेंबर-ऑक्टोबर १९९६/रुपये १२

# श्री साईलीला

संपादक : द. म. सुकथनकर

कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे



॥ श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक ॥


# गुरूपौर्णिमा उत्सव : काही क्षणचित्रे



श्री साईसच्चरित्राच्या अखंड पारायणाचा
श्रीगणेशा करताना विश्वस्त श्री. सोनी.



उत्सवातील मिरवणुकीसाठी श्री बाबांच्या पादुका घेऊन
जाताना श्री साईदास.



श्री साईबाबांच्या समाधीजवळील पादुकांवर अभिषेक करताना विश्वस्त
श्री. मोहनराव जयकर, सौ. जयकर, विश्वस्त श्री. रामचंद्र गोसावी, सौ. गोसावी.

छायाचित्रे : श्री. भोलानाथ समेळ आणि श्री. नितिन मिराणी.

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला



## श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक

: संपादक :

**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :

**विद्याधर ताठे**

कार्यालय : 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१६ ६५ ५६ फॅक्स : (०२२) ४१५ ०७ ९८

| : मुद्रक : | : टाईपसेटींग : | : मुखपृष्ठ : |
|---|---|---|
| गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई. | देवयानी एन्टरप्रायझेस्, दादर. | हरेश जाधव |

वार्षिक वर्गणी : रु. ५०/- ● आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
● परदेशाकरिता वार्षिक वर्गणी : रु. १०००/- (टपाल खर्चासहित)

द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी
यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे छापून प्रसिद्ध केले आहे.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून
त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



# श्री साईबाबा संस्थान शिरडी


## विश्वस्त मंडळ

श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. रायभान ग. चिने | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | '' | श्री. भास्कर शं. बोरावके | '' |
| श्रीमती रेखा ग. दिघे | '' | श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील | '' |
| श्री. प्रकाश व. कारखानीस | '' | श्री. राजीव पुं. रोहोम | '' |
| श्री. मुकेश र. पटेल | '' | श्री. संभाजी कि. काळे | '' |
| श्री. मधुकर द. जोशी | '' | श्री. अशोक भि. खांबेकर | '' |
| श्री. प्रकाश पी. वैशंपायन | '' | सौ. प्रेमाबाई सो. बज | '' |
| श्री. मधुकर ज. गर्दे पाटील | '' | श्री. रामचंद्र नि. गोसावी | '' |
| श्री. देवकीनंदन सारस्वत | '' | श्री. प्रभाकर तु. बोरावके | '' |
| श्री. आप्पासाहेब खं. कोते | '' | श्री. सोपान मा. धोर्डे | '' |

कार्यकारी अधिकारी : श्री. स. स. पेंडसे


# अंतरंग


| | पृष्ठ क्र. |
|---|---|
| ❑ **मनोगत** : द. म. सुकथनकर | ४ |
| ❑ **संपादकीय** : विद्याधर ताठे | ५ |
| ❑ **विश्वस्त मंडळाचे कार्य आढावा** | ९ |
| ❑ **शिरडी वृत्त** | १३ |
| ❑ **श्री साई – युगावतार** : चकोर आजगांवकर | १८ |
| ❑ **परमाचार्य** : न्या. रंगनाथजी मिश्र | २० |
| ❑ **आचार्यांची दिव्यदृष्टी** : एस. गुरूमूर्ती | २४ |
| ❑ **महायोगी देवराहा बाबा** : सुरेशचंद्र वारघडे | २६ |
| ❑ **ज्ञानदेव–विवेकानंद** : डॉ. हे. वि. इनामदार | ३१ |
| ❑ **संतकवि दासगणू** : डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे | ३४ |
| ❑ **महामानव विनोबा भावे** : म. श्री. दीक्षित | ३७ |
| ❑ **संत गाडगे महाराज** : डॉ. रामचंद्र देखणे | ३९ |
| ❑ **साईवंदना** : योगेश अभ्यंकर | ४२ |
| ❑ **महाराष्ट्राचे नाथ – संत एकनाथ** : गजानन कुलकर्णी | ४३ |
| ❑ **श्री ज्ञानेश्वरी – चिरंजीवी ग्रंथ** : एस. ए. कुलकर्णी | ५६ |
| ❑ **श्री नाथभागवत** : विद्याधर ताठे | ६२ |
| ❑ **दासबोध – समर्थांचा दिव्य संदेश** : कृष्णा तेली | ६५ |
| ❑ **नवनाथ भक्तीरसामृत** : अशोक मोहिते | ६८ |
| ❑ **अनुभवामृत** : डॉ. ग. वा. तगारे | ७२ |
| ❑ **आदिशक्ती मुक्ताई** : डॉ. अशोक कामत | ७५ |
| ❑ **ग्रंथ परिचय** | ७७ |
| ❑ **ज्ञानेश्वरीची जन्मभूमी** : स. कृ. देवधर | ८० |
| ❑ **मक्का–मदिना** : डॉ. यु. म. पठाण | ८३ |
| ❑ **श्रीक्षेत्र दाणोली** : भालचंद्र गन्द्रे | ८५ |
| ❑ **निराकार तो येथे साकार जाला** : डॉ.न.म. जोशी | ८९ |
| ❑ **साईचे बोल होती न फोल** : (अनुभवकथन) | ९२ |
| ❑ **शिरडीचे श्री साई** : चंद्रकांत गरगटे | ९६ |
| ❑ **जगन्माता साई** : शाम जुवळे | ९८ |
| ❑ **असे भक्त अशी भक्ती** | १०२ |
| ❑ **भक्तांना आवाहन** | १०४ |


**श्री साईलीला**



श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक






# मनोगत

द. म. सुकथनकर

*माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हे हरेल सर्व त्याचें ।*
*जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धांवेन भक्तांसाठी ॥*

मोहनीराज पंडित यांनी अभंगरूपाने लिहीलेल्या श्री बाबांच्या वचनांमधील वरील दोन ओळी, श्री साईबाबांच्या पुण्यतिथी वेळी भाविक भक्तांच्या भावमनात एक प्रकारचा आर्त गहिवर निर्माण करतात. इ.स. १९१८ साली बाबा इहलोक सोडून गेले, आज त्यास ७८ वर्षे झाली असली तरी बाबांचे अस्तित्व भक्तांना पदोपदी जाणवत आहे. हाच बाबांचा अतर्क्य महिमा आहे. हीच त्यांची अगाध-अगम्य लीला आहे.

श्री बाबांच्या ७८व्या पुण्यतिथीचा **'श्री साईलीला'**चा हा विशेषांक बाबांच्या चरणी अर्पून साईभक्तांच्या हाती देताना मला कर्तव्यपूर्तीचा आनंद होत आहे. 'श्री साईलीला'च्या मध्यंतरी अनियमित व विस्कळीत झालेल्या प्रकाशनामुळे हजारो साईभक्तांप्रमाणेच, आम्ही विश्वस्त मंडळीही अस्वस्थ होतो. पण बाबांच्याच असीम कृपेने आता **'श्री साईलीला'** गेले वर्षभर अत्यंत नियमित व वेळेवर प्रकाशित होत आहे ही आपणा सर्वांच्याच दृष्टिने आनंदाची गोष्ट आहे.

गेल्या वर्षी (इ.स. १९९५) ऑगष्टमध्ये व्यवस्थापन मंडळाने संतसाहित्याचे अभ्यासक, पत्रकार **विद्याधर ताठे** यांचेकडे 'श्री साईलीला'च्या कार्यकारी संपादकाची जबाबदारी दिली आणि बाबांच्या कृपेने व श्री ताठे यांच्या प्रयत्नाने सर्व प्रलंबित अंक प्रकाशित करून 'श्री साईलीला' नियमितपणे प्रसिद्ध होऊ लागले. विशेषत: गेल्या वर्षातील **पुण्यतिथी विशेषांक, रामनवमी विशेषांक** आणि **गुरूपौर्णिमा विशेषांक** हे तिन्ही अंक त्या त्या दिवशी उत्सवात श्री बाबांच्या चरणी अर्पण करण्यात आले ही एक समाधानाची घटना म्हणता येईल. त्याचप्रमाणे गेल्या वर्षातील 'तीर्थक्षेत्र विशेषांक', 'संतसंग विशेषांक' वाचकांना विशेष आवडल्याचे त्यांच्या अभिप्राय पत्रांवरून दिसून आलेले आहे. 'श्री साईलीला' हे आध्यात्मिक-क्षेत्रातील एक अग्रगण्य नियतकालिक व्हावे अशी सर्व साईभक्तांप्रमाणेच आम्हा विश्वस्तांची पण तीव्र इच्छा आहे. ही इच्छा श्री साईकृपेने सिद्धीस जावो ही प्रार्थना करून या मनोगतास पूर्ण विराम देतो.



द. म. सुकथनकर

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान शिरडी.

# संपादकीय


विद्याधर ताठे




*अभिप्सितार्थ सिद्धचर्थ । स्मरू नित्य 'साईसमर्थ' ।*
*याच मंत्रे साधू परमार्थ । होऊ कृतार्थ निजनिष्ठा ॥*

हेमाडपंतांच्या 'श्री साईसचरित्'मधील २५व्या अध्यायातील १०५ क्रमांकाची वरील ओवी, विशेष चिंतनीय आहे. खरं तर हेमाडपंतांचा हा साईकृपाप्रसादमंडित ग्रंथ, अध्यात्मिक चिंतनशील साधकांना एक अमृतकुंभच आहे. 'श्री साईलीला'च्या कार्यकारी संपादकपदाची जबाबदारी माझ्याकडे आली आणि 'श्री साईसचरित्' ग्रंथाचे अमृतपान करण्याचे परमभाग्य मला लाभले. अर्थात ही सुद्धा एक साईलीलाच ! कारण दैनिक वृत्तपत्रातील राजकारणादी बहुचर्चित विषयात रमलेल्या पत्रकारास अचानक अध्यात्मिक नियतकालिकाकडे वळण्याची सुबुद्धी सुचावी तर कशी आणि सुचली तरी त्यात रूची वाटावी तरी कशी ? **'बहुत सुकृताची जोडी । म्हणोनि विठ्ठल आवडी ।'** असे संत तुकाराम महाराजांचे वचन आहे. त्याप्रमाणेच पूर्वसुकृत आणि श्री बाबांच्या सेवेचा अदृष्टातील भाग्ययोग म्हणूनच हे सेवाकार्य मला लाभले असे मला वाटते.

पुणे विद्यापीठात संतसाहित्य विषय प्रधान घेऊन मी 'एम.ए.' करीत असताना मराठी व हिंदीतील संतसाहित्य अगदी अधाशासारखे वाचले. अनेक नव्या-नव्या अपरिचित विभूतींचा-संतांचा त्याद्वारे मला शब्द-समागम घडला. पण या काळात श्री साईबाबांबद्दल मात्र माझ्या काहीही वाचनात आले नाही. कदाचित बाबांचे स्वतःचे असे अभंग-ओवीबद्ध लेखन ग्रंथरूपाने नसल्यामुळे विद्यापीठीय अभ्यासकांना ते (बाबा) अपरिचित राहात असावेत. पुढे थोर विचारवंत श्री. अ. दा. आठवले (सध्याचे उत्तरकाशीस्थित स्वामी वरदानंद भारती) यांनी संपादीत व प्रकाशित केलेल्या संतकवी दासगणूंच्या वाङ्मयखंडामध्ये श्री साईनाथ महाराजांबद्दल काही आख्यानकाव्य वाचण्यात आले आणि श्री साईबाबांशी माझा प्रथमच अक्षर परिचय झाला. दासगणूंच्या चरित्रातील साईबाबांचे प्रकरण वाचून बाबांच्या अतर्क्य महिम्याची जाणीव झाली. बाबांबद्दल एक आश्चर्यजनक विलक्षण कुतूहल मनी मानसी निर्माण झाले. शिरडीची







वारी घडली. बाबांच्या आरतीने मन भारावून गेले. अनेक भ्रम दूर झाले. **'शिरडी माझे पंढरपूर ।'** या आरतीवेळी म्हटल्या जाणाऱ्या दासगणुंच्या अभंगवचनाने मनाची पकड घेतली. पुढे का कोणास ठाऊक अनेक वेळा मी ती ओळ अनेक वर्षे मधूनमधून गुणगुणत असे. त्यावेळी, कधीकाळी बाबांची सेवा करण्याचे; बाबांच्या नियतकालिकाचे कार्यकारी संपादक होण्याचे भाग्य आपणास लाभेल असे मला स्वप्नातही वाटले नव्हते. पण जे स्वप्नात वाटले नव्हते ते पुढे सत्यात घडले आणि मला साईसेवेचा लाभ झाल. हजारो साईभक्तांशी संवाद साधण्याची पर्वणी प्राप्त झाली. अर्थात ही सुद्धा एक साईलीलाच नव्हे काय ?

गेले वर्षभर 'श्री साईलीला'चा कार्यकारी संपादक म्हणून श्री बाबांनी माझी सेवा रूजू करून घेतलेली आहे. या काळात सर्व प्रलंबित अंक प्रसिद्ध करून श्री साईलीला नियमितपणे प्रकाशित करण्यात बाबांनी मला यश दिले, ही माझ्या दृष्टिने अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. अर्थात हे कार्य बाबांच्या कृपेने सिद्धीस गेले असून मी केवळ एक निमित्तमात्र आहे याची मला मनोमन खात्री आहे.

*माझी करोनिया लेखणी । बाबाचि गिरवितील माझा पाणी ।*
*मी तो केवळ निमित्ताला धणी । अक्षरे वळणी वळवितो ॥४४॥*



हा हेमाडपंती भाव हे सर्व कार्य करताना माझ्या मनी दाटलेला असून माझी ही सेवा वाचकांनी गोड मानून घेतली, खास पत्रे पाठवून अभिप्राय कळवून मला स्फूर्ती दिली, नव्या उपक्रमांचे सहर्ष स्वागत केले याबद्दल मी सर्व वाचकांचा व आजवरचे सर्व अंक वेळेवर प्रकाशित करण्यासाठी सहकार्य देणाऱ्या सर्वांचा ऋणी आहे. विशेषत: गीता ऑफसेटने साईभक्त म्हणून वेळोवेळी केलेले सहकार्य विशेष उल्लेखनीय आहे.

**प्र**स्तुतचा विजयादशमीचा श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक नेहमीच्या अंकापेक्षा अधिक पानांचा असून साईभक्तांचा दसरा-दिवाळीचा आनंद शतगुणीत करणारा ठरावा अशी अपेक्षा आहे. नेहमीप्रमाणे या अंकातही सद्गुरू साईनाथांच्या शिकवणुकीवर त्यांच्या विचार-प्रसारावर भर देण्यात आला असून भक्तांची जिज्ञासा लक्षात घेऊन शिरडी वृत्ताला अधिक प्राधान्य देण्यात आलेले आहे. चावडीचा जीर्णोद्धार, समाधी मंदिर परिसराच्या योजनाबद्ध विकासासाठी





झालेल्या अ.भा. वास्तुशास्त्रज्ञांच्या स्पर्धेचा वृत्तांत, विद्यमान व्यवस्थापन मंडळाच्या गेल्या २ वर्षांच्या कारकिर्दीचा कार्यवृत्तांत, शिरडीतील गुरूपौर्णिमा उत्सवाचे सचित्र दर्शन आणि भक्तांचे साईप्रचितीचे अनुभव कथन आदी साहित्य वाचून साईभक्तांना आपण शिरडीमध्येच आहोत अशाप्रकारचे सुखसमाधान होईल असे वाटते. कारण -

***शिरडींत साईंचा समागम । तोचि आम्हा आगम-निगम ।***
***तोचि सकळ संसारोपशम । अत्यंत सुगम परमार्थ ॥ (४:६१)***

ही साईभक्तांची भावनिष्ठा मी जाणून आहे.

या अंकामध्ये अनेक मान्यवरांचा सहभाग आहे. मला आवडलेला एक अध्यात्मिक-धार्मिक ग्रंथ; मला भावलेले संत-सत्पुरुष; आणि संस्मरणीय धार्मिक स्थळ या तीन विषयांवर प्रस्तुत अंकातील लेखांमध्ये भर देण्यात आला असून '**साधू दिसती वेगळाले । परी अंतरी (स्वरूपी) मिळालेले ।**' हेच एकात्मतेचे सूत्र दर्शविण्याचा त्याद्वारे प्रयत्न करण्यात आलेला आहे. **विविधतेत एकता** हे भारताचे व भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य असून श्री साईबाबांनी विविध भक्तांना त्यांच्या- त्यांच्या इष्ट देवतेच्या रूपात दर्शन देऊन याच सनातन सिद्धांताचा बोध केलेला आहे. '**जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।**' या उक्तीप्रमाणे कोणा भक्ताला श्रीरामाच्या रूपात, तर कोणाला श्री विठ्ठलाच्या रूपात तर कोणाला अक्कलकोट स्वामींच्या रूपात श्री साईबाबांनी दर्शन देऊन एकत्वाचा निःशब्द उपदेश केलेला आहे असे मला वाटते.




**इ.**स. १९२३ साली प्रारंभ झालेल्या 'श्री साईलीला'च्या वाटचालीस यंदा ७३ वर्षे पूर्ण झाली असून ७४व्या वर्षात पदार्पण झालेले आहे. पुढील वर्ष हे 'श्री साईलीला'चे अमृत महोत्सवी वर्ष आहे, त्यानिमित्ताने विश्वस्त मंडळाच्या व माझ्या मनात अनेक नव्या योजना - नवे उपक्रम आहेत. 'श्री साईलीला'चा अमृत महोत्सव हा साईभक्तांच्या हर्षाचा-आनंदाचा अनुपम असा क्षण आहे. त्यानिमित्ताने प्रत्येक साईभक्ताने मोठ्या निष्ठेने चिकाटीने नवे ११ सभासद 'श्री साईलीला'चे वर्गणीदार करण्याचा संकल्प करून श्री साईविचाराचे क्षितीज अधिकाधिक व्यापक करण्याचा प्रयत्न करावा ही नम्र विनंती. 'श्री साईलीला' मराठीतील सर्वाधिक खपाचे




धार्मिक-नियतकालिक म्हणून लोकमान्य व्हावे ही आमची इच्छा असून हजारो साईभक्त या कार्यात सहभागी झाले तर हे कार्य साईकृपेने सहज सिद्धीस जाईल याबद्दल मला खात्री आहे.

श्री साईलीला सुरवातीला **मासिक** म्हणून सुरू झाले. पुढे १९४८ ते १९५९ मध्ये ते **त्रैमासिक** करण्यात आले. १९५९ ते १९९० पुन्हा **मासिक** झाले आणि आता १९९० ऑक्टोबर पासून ते **द्वैमासिक** करण्यात आलेले आहे. पुढील अमृत महोत्सवी वर्षात ते पुन्हा पूर्ववत **मासिक** करण्याची आमची तीव्र इच्छा असून ही गोष्ट सर्वश्री श्री साईबाबांची कृपा व साईभक्तांचे सहकार्य यावरच अवलंबून आहे.

कागदाच्या प्रचंड वाढलेल्या किंमती व छपाईचा वाढलेला दर लक्षात घेता खूप मोठ्या संख्येने वर्गणीदार वाढले तरच आहे तेव्हढ्या अल्प वर्गणीत हे नियतकालक देता येणे शक्य आहे. अन्यथा वर्गणीच्या रक्कमेत वाढ ही अपरिहार्य आहे. इतर नियतकालिकांना जाहिरातीचे मोठे उत्पन्न असते. 'श्री साईलीला'स तशाप्रकारचे उत्पन्न नाही हे लक्षात घेता वर्गणीत वाढ ही अपरिहार्य ठरते. तरी पण विद्यमान विश्वस्त मंडळाने गेल्या २ वर्षात वर्गणी न वाढविता साईभक्तांना उत्तम दर्जाचा अंक देण्याचे कार्य केलेले आहे.



**दसरा सण मोठा । नाही आनंदा तोटा ।** अशा दसऱ्याच्या दिनी-बाबांच्या पुण्यतिथीच्या मुहूर्तावर 'श्री साईलीला'चा प्रस्तुतचा विशेषांक साईभक्तांच्या हाती देताना, एक प्रश्न मनात येतो की, आपणाला साईभेटीची-साईदर्शनाची एवढी ओढ लागते; मग जगन्माता साईस आपल्या भक्ताच्या भेटीची ओढ लागत असेल का ? ती साईमाऊली आपल्या भक्तांची वाट पाहत असेल का ? हो ! निश्चितच ! **वाट पाहे उभा । भेटीची आवडी ।** अशी ती ताटकळत तर बसली नसेल ना ! चला लवकरच चला !

*उठा उठा सकळ जन । पाहू चला साईचरण ।*
*तुटोनि जाईल भवबंधन । भावे चरण पाहताची ॥*

**(विद्याधर ताठे)**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला

# विद्यमान व्यवस्थापन मंडळाच्या दोन वर्षाच्या कारकिर्दीचा संक्षिप्त आढावा

— ❖ ❖ ❖ —

*श्री साईबाबा संस्थानचा अवाढव्य कारभार योग्यप्रकारे संचालित करण्यासाठी मा. धर्मादाय आयुक्त यांनी नेमलेल्या, श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखालील व्यवस्थापन मंडळास सप्टेंबर ९६ मध्ये दोन वर्षे पूर्ण झाली असून या दोन वर्षातील मंडळाच्या कार्याचा संक्षिप्त आढावा आम्ही साईभक्तांसाठी येथे दिलेला आहे.*

— ❖ ❖ ❖ —

❑ दि. २५ सप्टेंबर १९९४ रोजी उपरोक्त नवनिर्वाचित व्यवस्थापन मंडळाची पहिली सभा शिरडी येथे झाली व या सभेपासूनच त्यांच्या कार्याचा श्रीगणेशा झाला.

❑ गेल्या दोन वर्षात विद्यमान व्यवस्थापन मंडळाच्या (ऑगष्ट १९९६ अखेर) एकूण २० सभा झाल्या. त्या पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| ● २५ सप्टेंबर ते डिसेंबर १९९४ | - | ३ सभा |
| ● जानेवारी ते डिसेंबर १९९५ | - | ९ सभा |
| ● जानेवारी ते ऑगष्ट १९९६ | - | ८ सभा |
| | | ======= |
| | | २० सभा |

❑ सर्व सभा अपेक्षित गणसंख्यापूर्ती होऊन अगदी वेळेत सुरू झाल्या व सर्वांच्या मनमोकळ्या सहभागाने व सहकार्याने पार पडल्या. या सर्व सभा शिरडी येथेच झाल्या.

❑ श्री साईबाबांच्या सामुदायिक प्रार्थनेने प्रारंभ झालेल्या या सभांमध्ये सर्व निर्णय सर्वांच्या सहमतीने-एकमताने घेण्यात आले हे विशेष. त्या निर्णयांपैकी काही निर्णय पुढीलप्रमाणे -

### अभिषेक शुल्क कमी केले

श्री साईबाबांच्या भक्तांना यापूर्वी अभिषेकासाठी रु. १०१/- द्यावे लागत होते. नव्या विश्वस्त मंडळाने सर्वसामान्य भक्तांची श्री साईअभिषेक करण्याची तीव्र इच्छा व त्यांची आर्थिक क्षमता लक्षात घेऊन अभिषेकाचे शुल्क रु. १०१/-चे केवळ रु. २५/- केले. यामुळे गरीब भक्तांनाही आता श्री साईअभिषेक करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झालेली आहे.

### नव्या ४५० खोल्या खुल्या केल्या

साईभक्तांची वाढती गर्दी व त्यांना निवासासाठी अपुरी पडणारी खोल्यांची संख्या लक्षात घेऊन विद्यमान विश्वस्त मंडळाने नव्या भक्त निवासातील खोल्या तत्परतेने बिल्डरकडून ताब्यात घेतल्या व भक्तांसाठी खुल्या केल्या. या नवीन ४५० खोल्यामुळे असंख्य भक्तांची सोय झाली असून खासगी लॉज-हॉटेलसाठी त्यांना पडणारा भुर्दंड कमी झाला आहे. अर्थात भक्तांची संख्या अलिकडे इतकी वाढलेलीआहे की या ४५० खोल्याही कमी पडत आहेत. या गोष्टीची जाणीव ठेवून विद्यमान विश्वस्त मंडळ अधिकाधिक सोयी-सुविधा निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे.

### मोफत बस सेवा सुरू केली

नवीन भक्तनिवास ते समाधी मंदिर या दरम्यान अंतर लक्षात घेऊन भक्तनिवास ते मंदिर अशी मोफत बस सेवा सुरू करून विद्यमान विश्वस्त मंडळाने भक्तांची, खासगी रिक्षा आदी वाहनचालकांकडून होणाऱ्या अडवणुकीपासून सुटका केलेली आहे. तसेच मंदिराकडून भक्तनिवासाकडे जाण्यासाठीही या बससेवेमुळे भक्तांची विनामूल्य बहुमोल सोय झालेली आहे.

### दर्शनव्यवस्थेत सुलभता आणली

दर्शन बारीमध्ये भक्तांचे ऊन वारा पावसापासून उत्तमप्रकारे

रक्षण होऊन कमीत कमी कष्ट व्हावेत याकडे विद्यमान विश्वस्त मंडळाने अधिक लक्ष दिले आणि लेंडी बागेतील बोजड लाकडी कठडे काढून टाकून लोखंडी सुटसुटीत कठडे बसविलेले आहेत तसेच बारीच्या मार्गावर पाणी साचून कोठेही चिखल वा अस्वच्छता होऊ नये यादृष्टिने सर्वत्र लाद्या बसविण्यात आल्या आहेत.

**स्वच्छतेवर भर**

केवळ बाह्य रंगरंगोटीवर भर न देता संस्थानचा सर्व परिसर-इमारती स्वच्छ ठेवण्यावर विद्यमान विश्वस्त मंडळाने विशेष भर दिला आहे. या दृष्टीने संस्थान परिसरात लाद्या बसविणे, परिसरातील व परिसर हद्दीबाहेरील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे या सारखी कामे विनाविलंब पूर्ण करण्यात आली. कंत्राटी पद्धतीने स्वच्छता-साफसफाईचे काम करून घेणे व त्यावर खास लक्ष व देखरेख ठेवण्यासाठी विश्वस्तांची एक उपसमितीही स्थापन करण्यात आलेली आहे. ठिकठिकाणी आकर्षक कचरा-पेटचांची सोय करून त्या पेटीतच भक्तांनी कचरा टाकावा याविषयी त्यांना सूचना देऊन जागृती करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**पिण्याच्या पाण्यासाठी 'कुलर्स'ची सोय**

भक्तांना पिण्याचे थंड पाणी सहजतेने उपलब्ध व्हावे म्हणून संस्थानद्वारे ठिकठिकाणी **'वॉटर कुलर्स'** बसविण्यात आलेले आहेत. यामुळे भक्तांना स्वच्छ व **थंडगार** पाणी मिळण्याची सोय झालेली आहे.

**श्री साईसच्चरित् पारायणाची व्यवस्था**

श्री साईसच्चरित् ग्रंथाचे श्री बाबांच्या समाधी मंदिर परिसरातच पारायण करून बाबांची कृपा संपादन करावी अशी अनेक भक्तांची इच्छा असते. अशा भक्तांची वाढती संख्या लक्षात घेऊन विद्यमान विश्वस्त मंडळाने शामसुंदर हॉलमध्ये शांततामय स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. कोणताही त्रास न होता आता अनेक भक्त एकाचवेळी शांतपणे पारायणाचा आनंद घेऊ शकतात.

**श्री साईनाथ रूग्णालयात नव्या सोई**

संस्थानतर्फे चालविल्या जाणाऱ्या श्री साईनाथ रूग्णालयामध्ये अत्याधुनिक सोई करण्याचा विद्यमान विश्वस्त मंडळाने निर्णय घेऊन पुढील यंत्रसामुग्री आणून रूग्णालय सुसज्ज केले. डायलिसीस मशिन, दोन कृत्रिम रेस्पिरेटर्स, दंत विभागासाठी लाईट क्युअर सिस्टीम, अल्ट्रासोनिक स्केल, बालरूग्ण विभागासाठी रेडियंट हिट वॉर्मर, फोटो थेरपी युनीट, बेबी इनक्युबेटर आदी आधुनिक यंत्रसामुग्रीचा त्यात समावेश आहे.

तसेच रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन औषध खरेदीचे प्रमाणात वाढ केली व त्यासाठी जादा रक्कमेची तरतुद करण्यात आली.

५०० खाटांचे हॉस्पिटल स्थापन करण्यासाठी टप्पावार विस्तारीकरणाकरिता योजना तयार करण्यात येत असून ती सत्वर कार्यवाहीत आणण्याचा मंडळाचा निर्धार आहे.

**'आय.टी.आय' विस्तारीकरणाचे भूमिपूजन**

संस्थानतर्फे चालविल्या जात असलेल्या आय.टी.आय. संस्तेत 'टूल ॲण्ड डायमेकर' आणि 'टर्नर' असे दोन नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले.

आय.टी.आय. साठी लागणाऱ्या विस्तारित इमारतीचा (अंदाजे रु. ६३ लाख) भूमिपूजन समारंभ करण्यात आला असून बांधकाम झपाट्याने प्रगतीपथावर आहे. वर्षभरात ते पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. संस्थानच्या कन्याशाळेत **शिवणवर्ग** सुरू करण्यात आला.

**अनुदान तरतुदीत वाढ**

संस्थानतर्फे दरवर्षी हृदयशस्त्रक्रिया, किडनी दोष, कॅन्सर आदी खर्चिक उपचारांसाठी गरजूंना त्यांची गरज लक्षात घेऊन आर्थिक अनुदान दिले जाते. यासाठी पूर्वी असलेली १५ लाखांच्या तरतुदीची रक्कम विद्यमान विश्वस्त मंडळाने वाढवून ३० लाख एवढी केली असून खालीलप्रमाणे अनुदान वितरित करण्यात आलें -

| | |
|---|---|
| फेब्रुवारी १९९६ | रु. ५,८६,१००/-, |
| मार्च १९९६ | रु. २,३९,८००/-, |
| एप्रिल १९९६ | रु. १०,४०,६००/-, |
| मे १९९६ | रु. ४,६२,०००/-, |
| जून १९९६ | रु. ४,४०,०००/-. |

आवश्यकतेनुसार यासाठीची आर्थिक तरतूद जादा वाढविण्यात येईल.

**'श्री साईलीला'चे प्रकाशन सुरळीत-नियमित केले**

'श्री साईलीला'चे १९९४मध्ये पूर्णपणे विस्कळीत व अत्यंत

अनियमित झालेले प्रकाशन, विद्यमान व्यवस्थापन मंडळाने, कार्यकारी संपादकपदी अनुभवी पत्रकार व संतसाहित्याचे व्यासंगी अभ्यासक **श्री. विद्याधर ताठे** यांची नियुक्ती करून नियमित व सुरळीत केले. आता 'श्री साईलीला'चे मराठी आणि हिंदी-इंग्रजी अशा दोन्ही अंकांचे प्रकाशन अत्यंत नियमित झालेले आहे. याबाबत वाचक भक्तांची आलेली अभिप्राय पत्रे व्यवस्थापन मंडळाचा उत्साह द्विगुणीत करणारी आहेत. 'श्री साईलीला'चे दसरा (१९९५) पुण्यतिथी विशेषांक, रामनवमी (१९९६) विशेषांक, गुरुपौर्णिमा विशेषांक हे त्या त्या शुभदिनीच श्री बाबांच्या चरणी अर्पण करून विधीपूर्वक प्रकाशित करण्यात आले.

**पूर्णवेळ कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती**

संस्थानचा अवाढव्य कारभार योग्यप्रकारे संभाळण्यासाठी व येणाऱ्या भक्तांची अधिकाधिक चांगली सोय होण्यासाठी विद्यमान व्यवस्थापन मंडळाने नव्याने २ प्रशासन अधिकारी नियुक्त करून प्रशासन धिकाऱ्यांची संख्या ४ केली व त्यांना वेगवेगळ्या विभागांचा कारभार पाहण्याची जबाबदारी दिली. तसेच संस्थानसाठी आजवर पूर्णवेळ कार्यकारी अधिकारी नव्हता. जिल्ह्यातील उपजिल्हाधिकाऱ्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार असे. उपजिल्हाधिकाऱ्यांना असणारी अनेक कामे पाहता मनात असूनही त्यांना पाहिजे तेवढा वेळ संस्थानला देणे शक्य होत नव्हते. ही गोष्ट लक्षात घेऊन व्यवस्थापक मंडळाने केलेल्या प्रयत्नामुळे चैत्र प्रतिपदा (एप्रिल १९९६) पासून **श्री. स. स. पेंडसे**, निवृत्त धर्मादाय उपआयुक्त यांची पूर्णवेळ कार्यकारी अधिकारी म्हणून मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी नियुक्ती केली असून त्यामुळे संस्थानच्या कार्यात एका सक्षम-अनुभवी अधिकाऱ्याचे योगदान प्राप्त झालेले आहे.

**काही अन्य निर्णय**

- भक्तांना भोजनप्रसादाच्या किंमतीत कोणतीही वाढ न करता एक रुप्याचा लाडू प्रसाद म्हणून अधिक देण्यास प्रारंभ केला.
- मंदिर परिसरातील व हद्दीबाहेरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यात आले. हद्दीबाहेरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करून संस्थानने स्थानिक नागरिक व नगरपालिका यांना आपले विधायक सहकार्य दिलेले आहे.
- संस्थानतर्फे प्रकाशित होणारी श्री साई दैनंदिनी (डायरी) १९९६ पासून १ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशा प्रकाशित करण्यात आली. पूर्वी ती चैत्र प्रतिपदेला, म्हणजे एप्रिल महिन्यात, प्रकाशित होत असे व त्यामुळे ती अनेक भक्तांना गैरसोईची वाटत होती. भक्तांच्या सूचनांची योग्य दखल घेऊन संस्थानने वरीलप्रमाणे बदल करून भक्तांच्या सूचनांना देण्यात येणारे महत्व दाखवून दिलेले आहे.



- शिरडी येथे भक्तांची संख्या, विविधता व गरज लक्षात घेऊन प्रसादालयात स्वरूची (बुफे सिस्टीम) भोजन पद्धतीचा दि. २८/१२/९५ पासून प्रारंभ केला आहे.
- विद्यमान विश्वस्त मंडळाने इ.स. १९९६ चे श्री साईबाबांचे सुंदर चित्र असलेले कॅलेंडर काढले. हा उपक्रम प्रथमच सुरू करण्यात आला. कॅलेंडरला साईभक्तांकडून खूप उत्तम प्रतिसाद लाभला. केवळ ८/- रुपयांमध्ये हे कॅलेंडर भक्तांना विकण्यात आले.
- शिरडी क्षेत्र रेल्वेमार्गावर आणण्याची, त्याविषयीचा व्यवस्थापन मंडळाचा ठराव रेल्वे प्रशासनाकडे पाठवून, मागणी करण्यात आली.

### चावडी, समाधीमंदिर आदी इमारतींचा जीर्णोद्धार

श्री साईबाबांच्या वास्तव्याने पावन झालेल्या सर्व वास्तुंचे जसेच्या तसे रक्षण व सुदृढीकरण करण्याच्या दृष्टिकोनातून आधुनिक रसायन व तंत्रज्ञानाचा उपयोग करून जीर्णोद्धार व योग्यप्रकारे जतन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्यानुसार बाबांच्याचावडीचे काम पूर्ण झाले आहे. तशाचप्रकारे द्वारकामाई व समाधीमंदिर (बुट्टीवाडा) यांचेही काम हाती घेण्यात आले असून ते प्रगतीपथावर आहे. (कृपया, याच अंकात दिलेला सविस्तार वृत्तांत वाचावा.)

### वास्तुशास्त्रज्ञांची राष्ट्रीय स्पर्धा

श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचा योजनाबद्ध विकास करण्याच्या उद्देशाने विद्यमान व्यवस्थापन मंडळाने वास्तुशास्त्रज्ञांची राष्ट्रीय पातळीवर खुली स्पर्धा योजली व आलेल्या 'कल्पनाचित्रे-मॉडेल्स' मधून मान्यवर तज्ञ समितीद्वारे प्रथम क्रमांकाच्या मॉडेल व कल्पनाचित्रची निवड करण्यात आली.

या स्पर्धेसाठी आलेल्या सर्व मॉडेल्स व कल्पनाचित्रांचे सर्व साईभक्तांसाठी मुंबई व शिरडी येथे प्रदर्शनही भरविण्यात आले. प्रथम क्रमांक मिळालेल्या कल्पनाचित्राच्या आधारावर विस्तारीकरणाची योजना सत्वर प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याचे विद्यमान व्यवस्थापन मंडळाने ठरविले आहे. (स्पर्धेचा सविस्तर वृत्तांत याच अंकात अन्यत्र देण्यात आलेला आहे.)

### प्रसाधनसोईंसाठी 'सुलभ प्रकल्प'

शिरडीत येणाऱ्यांपैकी अनेक भक्तांना केवळ बाबांचे समाधीदर्शन होण्यासाठी लागणारा अल्पकाळच शिरडीत थांबायचे असते. अशावेळी स्वतंत्र खोली घेणे सोईचे नसते आणि खोल्याही बहुधा उपलब्ध नसतात. अशा भक्तांच्या प्रसाधनसोईंसाठी व तात्पुरते सामान ठेवण्यासाठी विश्वस्त मंडळाने **'सुलभ शौचालय'** प्रकल्प हाती घेतला असून त्यामध्ये लॉकरूमसह १२० संडास व १२० बाथरूमची सोय केली जात आहे. या प्रकल्पाचे बरेचसे काम पूर्ण होत आले असून साधारणपणे एप्रिल-मे १९९७ दरम्यान प्रकल्प वापरास खुला होण्याची अपेक्षा आहे.

### पोलिस चौकी बांधून दिली

शिरडी-मुंबई रस्त्यावर साईभक्तांना पुरेसे संरक्षण मिळण्याच्या दृष्टिने संस्थानतर्फे देर्डेगाव येथे नुकतीच एक पोलीस चौकी बांधून देण्यात आली आहे.

तसेच शिरडी येथील पोलीस स्टेशनची वाढती गरज लक्षात घेऊन स्टेशनमागे आणखी एक खोली बांधून देण्यात आली आहे.

### वहानतळांची सोय

भक्तांच्यावाहनांची प्रचंड वाढती गर्दी लक्षात घेऊन प्रसादालय परिसरात व नवीन भक्तनिवास परिसरात संस्थानतर्फे दोन मोठे वहानतळ निर्माण करण्यात आलेले आहेत.

### प्रसादालयाचे आधुनिकीकरण

प्रसादालयाची वाढती गरज लक्षात घेऊन स्वयंपाकासाठी लागणाऱ्याअत्याधुनिक यंत्रसामुग्रीने संस्थानने प्रसादालय सुसज्ज करण्यात येत असून कमीत कमी वेळेत अधिकाधिक भक्तांच्या प्रसादाची सोय यामुळे शक्य होईल.

प्रसादालयात स्वयंसेवी-सुरूची (बुफे) पद्धतीची नव्याने सोय करण्यात आली आहे.

## आदर्श साई प्रचारक

'श्री साईलीला'मधील आमच्या आवाहनास मान देऊन पुढील साईभक्तांनी पाच नवे वर्गणीदार आम्हास मिळवून दिले व साईविचार प्रसाराच्या कार्यात सक्रिय भाग घेतला त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. सर्व साईभक्तांनी या सक्रिय साईभक्तांच्या सेवेचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून श्री साईलीला अवघ्या महाराष्ट्रात घरोघर जाण्याच्या दृष्टिने नवे नवे वर्गणीदार करून सहकार्य करावे ही विनंती.

(१) श्री. के. आर. पाटील, इंदिरानगर, नाशिक.
(२) श्री. एस. के. वडे, माहिम रोड, पालघर (ठाणे).
(३) श्री. एकनाथ पु. पंडित, माहिम, मुंबई.
(४) श्री. उत्तम लाहोरकर, हदगाव, नांदेड.
(५) श्री. यशवंत रा. आडारकर, मार्मगोवा बंदर (गोवा).
(६) श्री. धर्माजी मो. पाटील, गडब, पेण (रायगड).
(७) सुरेश गो. साठवणे, हनुमाननगर, नागपूर.
(८) प्रभाकर रा. देशपांडे, विष्णुनगर, डोबिवली.
(९) अरूण प्रभाकर देसाई, गोवा.
(१०) पंडित व्ही. व्ही. पणशीकर (आबाजी), यु.के. युनायटेड किंगडम